**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०४/२०१५-१६/१२१ दिनांक: ०१-०९-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. ०४/२०१५-२०१६**

मे. अमित स्पिनिंग इंडस्ट्रीज लि., सांगवडे
मु.पो. सांगवडे ता. करवीर जि. कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)**

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
ग्रामिण विभाग-२ कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार**

**कोरमः-** १. श्री वि. श. गुळवणी, अध्यक्ष
२. श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी, अध्यक्ष ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) ग्राहक तक्रारदार - मे. अमित स्पिनिंग इंडस्ट्रीज लि., सांगवडे , ता.करवीर जि. कोल्हापूर यांनी प्रस्तुत तक्रारअर्ज दि. १५-०५-२०१५ रोजी या मंचासमोर दाखल केला असून त्यांच्या म्हणण्यानुसार तक्रारदार हे वि.प. यांचे वीज ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र.२६६८४९४०१२३८ असाआहे. तक्रारदार यांचे तक्रारअर्जातील निवेदनाचा सारांश या पुढील परिच्छे क्र.२ मध्ये नमूद करीत आहे.

२) मा. महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग (यापुढे संक्षिप्तपणे मा. आयोग असे म्हटले आहे).यांनी केस क्र.९५ /२०१३ , २८/२०१३ आणि ४४/२०१३ यामध्ये सप्टेंबर २०१३ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार वितरण कंपनी यानी अतिरिक्त विद्युत शुल्क-१ (यास यापुढे संक्षिप्तपणे अविशु असे नमूद केले आहे अवशि‍ु-२,अविशु-३ आणि अविशु-४ मा.आयोगाने दिलेल्या आदेशाचा भंग करुन, ऑगस्ट्र-२०१३ पासून ग्राहकांकडून वसूल करणेस सुरुवात केली. त्यानुसार वितरण कंपनीने ऑगस्ट २०१३ चे वीज देयक अविशु-१ ते अविशु-४ रुपये २३,०२,५५४/- चे समाविष्ट करुन तक्रारदार यांना पाठवले.

तथापि दरम्यान दि. २२-०८-२०१४ च्या निर्णयाने मा. अपिलीय न्यायाधिकरण यांनी केस क्र.९५/२०१३ मधील आदेश आणि मा.आयोगाचे इतर उपरोक्त आदेश रद्द करुन प्रकरणे फेर चौकशीसाठी मा. आयोगाकडे परत पाठवली आहेत. तसेच अपिल क्र.२३/२०१४ , ३० व ३१/२०१४ आणि ६५/२०१४ या मध्येही दिनांक २९-१०-२०१३ चे आदेश रद्द करुन प्रकरणे फेर चौकशीस पाठवली आणि त्यामधील अपिलार्थी यांना रिफंड मिळणेसाठी वितरण कंपनीकडे जाण्याची मुभा दिली.

मा. विद्युत लोकपाल, नागपूर यांनी रिप्रेझेंटेशन प्रकरणात दि.२२-१२-२०१४ रोजी आदेश करुन अविशु-१ व अविशु-२ व्याजासह परत करणेबद्दल आणि ऑक्टोंबर २०१३ पूर्वीचे वसूल केलेचे अविशु-३ व अविशु-४ व्याजासह परत करणेचा निर्णय दिला आहे.

सबब, तक्रारदार यांनी रक्कम रु. ९५,०२,४७२.३९ पैसे वितरण कंपनीकडून व्याजासह परत मिळणेबद्दल दि. ०२-०२-२०१५ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे धाव घेतली . परंतु सदर कक्षाने दोन महिन्यात कारवाई केली नसल्याने तक्रारदार यांनी मंचाकडे अपिल दाखल केले आहे.

३) दिनांक १८-०५-२०१५ रोजीच्या पत्राने वि.प. यांना प्रश्ननिहाय व मुद्देनिहाय स्पष्टीकरण दाखल करणेस मंचातर्फे कळविणेत आले होते. तथापि असे स्पष्टीकरणात्मक लेखी निवेदन यापूर्वी वि.प. यांनी दाखल केले नव्हते. परंतु सुनावणीचे दिवशी म्हणजे दिनांक ३०-०८-२०१६ रोजी वि.प. यांनी आपले लेखी म्हणणे पत्ररुपाने दाखल केले आहे. त्यांची प्रत ग्राहकास दिलेली नाही. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, महावितरण यांनी वाणिज्य परिपत्रक क्र.२०९ हे दिनांक ०७-०९-२०१३ रोजी जाहिर केले होते. त्यानुसार तक्रारदार यांना ऑगस्ट २०१३ चे देयक सप्टेंबर २०१३ मध्ये देणेत आले होते.मा. आयोगाच्या आदेशाप्रमाणे पुढील सहा हप्त्यांमध्ये अविशु वसूल करणेत आले. वि.पं. यांनी सदरच्या परिपत्रक क्र.२०९ ची प्रत दाखल केली आहे.

४) प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी यापूर्वी करता आली नाही असे दिसते. या मंचावरील अध्यक्षांचे पद बराच काळ रिक्त होते . प्रस्तुत अध्यक्षांची जुलै-२०१६ मध्ये नेमणूक झाल्यानंतर प्रस्तुत प्रकरण दिनांक २३-०८-२०१६ रोजी सुनावणीस नेमले. तथापि त्या दिवशी तक्रारदार यांचेतर्फे प्रतिनिधी श्री मुकूंदवार यांचा नागपूरहून फोन येऊन त्यांनी अपरिहार्य अडचणीमुळे येऊ शकत नसल्याचे कळविले. त्यानंतर प्रकरण दिनांक ३०-०८-२०१६ रोजी सुनावणीस नेमले.

५) दिनांक ३०-०८-२०१६ रोजी तक्रारदार तर्फे प्रतिनिधी श्री मुकूंदवार उपस्थित राहिले. वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री सागर मारुळकर उपस्थित होते. उभयतांनी आपल्या कथनांच्या पुष्टयर्थ , उपलब्ध कागदपत्रांचा आधार घेऊन, तोंडी युक्तिवाद केला आहे.

६) आम्ही अध्यक्ष व ऊभय सदस्यांनी उपलब्ध सर्व कागदपत्रांच्या व तोंडी निवेदनाचा साकल्याने विचार केला. या मंचाचे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार हे त्यांनी संबंधित कालावधीत वितरण कंपनीकडे जमा केलेली अतिरिक्त विद्युत शुल्काची (क्र.१ ते ४ ) रक्कम परत मिळणेस पात्र आहेत काय?

उत्तर:- होय, अंतिम आदेशात नमूद केल्याप्रमाणे.

२) तक्रारदार हे आता वि.प. यांचे ग्राहक नसल्यामुळे त्यांना या मंचाकडे दाद मागता येणार नाही असे वि.प. तर्फे युक्तिवादात केलेले निवेदन स्विकारार्ह आहे का?

उत्तर:- नाही

३) कोणता अंतिम आदेश?

उत्तर:- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

७) वि.पं. तर्फे कार्यकारी अभियंता श्री सागर मारुळकर यांनी असे प्रतिपादन केले की, तक्रारदार यांचा विद्युत पुरवठा कायम स्वरुपी दिनांक १४-०३-२०१५ पासून तोडला असल्यामुळे ते वि.प. यांचे ग्राहक नाहीत व त्यांना या मंचाकडे कोणतीही दाद मागता येणार नाही.

८) उपकार्यकारी अभियंता , हुपरी उपविभाग हुपरी यांनी कार्यकारी अभियंता ग्रामिण विभाग-२ कोल्हापूर यांना दिनांक २३.०३.२०१५ रोजी पाठवलेल्या पत्रावरुन असे दिसते की, तक्रारदार यांचा विद्युत पुरवठा कायम स्वरुपी दिनांक १४-०३-२०१५ रोजी तोडला होता. त्यापूर्वी म्हणजे दिनांक ०२.०२.२०१५रोजी तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे गा-हाणे दाखल केले होते. सदर कक्षाने तक्रारदार यांचे गा-हाणे दिनांक १०-०९-२०१५ रोजी रद्द करुन निकाली काढले. परंतु त्यापूर्वी दिनांक १५-०५-२०१५ रोजी तक्रारदार यांनी या मंचाकडे अपिल दाखल केले. तोंडी युक्तिवादाचे दरम्यान असे सांगण्यात आले आहे की, एखाद्या वीज ग्राहकाचा पुरवठा कायम स्वरुपी बंद केला तरीही असा ग्राहक सहा महिन्यांच्या आत जरुर ते शुल्क भरुन पुन्हा त्याच क्रमांकावर पुरवठा मिळवू शकतो व पुन्हा पात्र वीज ग्राहक बनू शकतो. ते काहीही असो, वरील हकीकत स्पष्टपणे दर्शविते की, या प्रकरणा संदर्भात तक्रारदार हे ग्राहक असल्याने त्यांना या मंचाकडे अपिल करण्याचा अधिकार आहे.

९) केस क्र.९५ /२०१३ मधील दि. ०५-०९-२०१३ च्या आदेशाने मा. आयोगाने वितरण कंपनीस अविशु-१ आणि अविशु-२ सप्टेंबर २०१३ पासून ठराविक कालावधीसाठी सर्व ग्राहकांकडून वसूल करण्यास अनुमती दिली. त्यापूर्वी दि. ०३-०९-२०१३ आणि दिनांक ०४-०९-२०१३. रोजी केस क्र.२८/२०१३ आणि ४४/२०१३ यामध्ये अविशु-३ व अविशु-४ सर्व ग्राहकांकडून वसूल करण्यास मा. आयोगाने अनुमती दिलेली होती. उपरोक्त प्रकरणातील मा. आयोगाचे निर्देश या केसमधील कागदपत्रात तक्रारदार यांनी दाखल केले

आहेत. त्यानंतर दि. ०७-०९-२०१३ रोजी वितरण कंपनीने वाणिज्य परिपत्रक क्र.२०९ चे जाहीर करुन सर्व अविशु विद्युत देयकांद्वारे वसूल करणेबाबत संबंधितांना आदेश जारी केले.

१०) दरम्यान, टाटा मोटर्स, लि. मुंबई यांनी मा. अपिलीय विद्युत न्यायाधिकरण यांच्याकडे अपिल क्र.२९५/२०१३ चे दाखल करुन मा. आयोगाच्या दि. ०५-०९-२०१३ च्या उपरोक्त आदेशास आव्हान दिले. त्या प्रकरणात मा. न्यायधिकरणाचा अंतिम निर्णय दिनांक २२-०८-२०१४ रोजी होऊन मा. आयोगाचे अविशु वसूल करणे बाबतचे सदर आदेश रद्द करणेत आले. तसेच प्रकरणांची फेर चौकशी करुन निर्णय करणेसाठी प्रकरणे मा. आयोगाकडे परत पाठवणेत आली. परिणामस्वरुप असे आता म्हणता येईल की, वाणिज्य परिपत्रक क्र. २०९ मधील अविशु वसुलीबद्दलचे महावितरणचे निर्देश रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे सदर परिपत्रकाप्रमाणे तक्रारदारांकडून अविशु यांची कायदेशीररित्या वसूली करणेत आली हे वि.प. यांचे म्हणणे योग्य ठरत नाही. अपिलीय न्यायधिकरणाची निर्णयपत्राची नक्कल तक्रारदार यांनी दाखल केलेली आहे.

११) तोंडी युक्तिवादाचे दरम्यान तक्रारदार यांचेतर्फे प्रतिनिधी श्री मुकूंदवार यांनी सांगितले की, मा. अपिलीय न्यायाधीकरणाने प्रकरणे रिमांड केलेनंतर अलिकडे मा. आयोगापुढे जन सुनावण्या पूर्ण झालेल्या असून मा. आयोग अविशु-१ ते ४ याबाबत आणि अन्य टेरिफबाबत लवकरच निर्णय जाहिर करण्याची शक्यता आहे.

१२) प्रस्तुत प्रकरणात, अर्थात, तक्रारदार हे जमा केलेल्या अविशु रक्कमेचा परतावा मिळणेस पात्र आहेत. मा. अपिलीय न्यायधिकरणाने अपिले क्र.२३/२०१४ आणि ६५/२०१४ यामध्ये त्यातील अपिलार्थी यांना महावितरणकडून अविशुचा रिफंड मागणेचा अधिकार आहे असे जाहिर केले होते.

त्यानंतर रिप्रेझेंटेशन क्र.६८/२०१४, ८८/२०१४ ते ९६/२०१४ आणि ११७/२०१४, १२२/२०१४ व १२७/२०१४ मध्ये दि. २२-१२-२०१४ च्या निर्णयाने मा. विद्युत लोकपाल, नागपूर यांनी त्यातील अपिलार्थी यांना त्यांचेकडून वसूल केलेच्याअविशुचा परतावा मिळणेचा अधिकार मान्य केला आहे.

१३) उपरोक्त सर्व विवेचना वरुन हे स्पष्ट होईल की, तक्रारदार यांची सदरची तक्रार खालील अंतिम आदेशात नमूद केलेप्रमाणे मान्य करणे क्रमप्राप्त आहे. वि.प. तर्फे श्री मारुळकर यांनी जोरकसपणे केलेल्या युक्तिवादाशी हा मंच सहमत होऊ शकत नाही.सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

## आदेश

१. उपरोक्त तक्रारदार - मे. अमित स्पिनिंग इंडस्ट्रीज लि., सांगवडे , ता.करवीर जि. कोल्हापूर यांचा तक्रार अर्ज खालील प्रमाणे अंशतः मंजूर करणेत येत आहे.

२. तक्रारदार यांचेकडून , ऑगस्ट २०१३ ते डिसेंबर २०१३ या कालावधीमतध्ये वि.प. - वितरण कंपनी यांनी वसूल केलेली अतिरिक्त विद्युत शुल्काची रक्कम वि.प. यांनी, डिसेंबर २०१६ पर्यन्त , विद्युत कायदा २००३ कलम ६२(६) प्रमाणे देय होणा-या व्याजासह तक्रारदार यांना परत करावी.

३. तथापि , असेही निर्देश देण्यात येतात की, यदाकदाचित जर उपरोक्त मुदती दरम्यान मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी अतिरिक्त विद्युत शुल्क वसूल करणेबाबत आदेश निर्गमित केले तर, यापूर्वी तक्रारदार यांनी वि.प.कडे जमा केलेली अतिरिक्त विद्युत शुल्काची रक्कम समायोजित करण्यास पात्र ठरेल.

४. सदर आदेशची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ कलम ८.७ वि.प. यांनी मंचास कळवावे.

५. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| श्री. पी. एस. बुरांडे, | (पी.व्ही. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |
| ग्राहक तक्रार मंच, कोल्हापूर | ग्राहक तक्रार मंच, कोल्हापूर | ग्राहक तक्रार मंच, कोल्हापूर |